**जातं**

कधी कधी कसं,
न बोलताच..
कळून जातं प्राक्तन,
एखाद्या नात्याचं..

धान्य भरडताना,
सर्वांनाच दिसतं..
दु:खं कळतं का?
फिरणाऱ्या जात्याचं ?

कोणी गप्प ही   बसून
करतं वार - आरपार,
न दाखवताच तोंड,
धारदार पात्याचं..

चक्रामध्ये अडकून,
भुकटी होत जाताना,
सगळेच ओढतो आपण..
आयुष्य आपल्या वाट्याचं !!

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**